# कोल्हापूर संस्थानातील १८५० ते १८९५ या काळातील शैक्षणिक प्रगती

**विवेकानंद राजाराम माने** इतिहास विभागप्रमुख, क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालय, कुंडल जि. सांगली

**प्रस्तावना:**

दक्षिणी संस्थानात कोल्हापूर संस्थानाला फार महत्व होते. कोल्हापूर राज्य म्हणजे कोल्हापूर संस्थान होय. सन १७१० ते १९४९ या काळातील कोल्हापूरास कोल्हापूर राज्य असे म्हटले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर छत्रपती संभाजीनी नऊ वर्षे व छत्रपती राजारामांनी अकरा वर्षे औरंगजेबाशी लढा देऊन स्वराज्य टिकविले. राजाराम महाराजांचे निधन २ मार्च १७०० रोजी सिंहगडावर झाले. त्यांच्या निधनासमयी त्यांच्या राणी ताराबाई व राजसबाई या पन्हाळ्यावर होत्या. रामचंद्रपंत अमात्य यांनी सिंहगडावर राजाराम महाराजांची उत्तरक्रिया आटोपून पन्हाळ्यावरील राण्यांचे सांत्वन केले आणि सर्व सेना प्रमुखांना पत्रे पाठवून राज्यरक्षणाची आज्ञा केली. या दरम्यान महाराणी ताराबाईनी आपला मुलगा शिवाजी यांची मुंज करून विशाळगड येथे त्यांचा राज्याभिषेक केला आणि औरंगजेबाशी त्याच्या मृत्युपर्यंत संघर्ष सुरु ठेवला.[१] फेब्रुवारी १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यु झाल्यावर मोगलांच्या कैदेतील संभाजीपुत्र शाहूची सुटका झाली. शाहू –ताराबाई संघर्षात शाहू विजयी झाल्याने ताराबाईने सन १७१०ला कोल्हापूर राज्याची स्थापना केल्याची घोषणा केली. त्यावेळी कोल्हापूर राज्याच्या सीमा पुढीलीलप्रमाणे होत्या. उत्तर अक्षांश १७–१०'–४५" व १५–५०'–२०" पुर्व रेखांश ७४–४४'–११" व ७३–४३'–१६".[२] आजच्या कर्नाटकामधील रायबाग व कटकोळ हा भाग पूर्वी कोल्हापूर राज्यात होता. कोल्हापूर राज्य २८५५ चौरस मैलाचे होते. दक्षिणी संस्थानात कोल्हापूर हे सर्वात मोठे संस्थान होते. या राज्याच्या उत्तरेला सातारा जिल्हा असून वारणा नदी तर ईशान्येला कृष्णा नदी होती. पूर्व व दक्षिण दिशांच्या सरहद्दीस बेळगाव जिल्हा होता. नेऋत्य दिशेला सावंतवाडी राज्य होते पश्चिमेला रत्नागिरी जिल्हा होता तसेच पूर्वेस व ईशान्येस सांगली, मिरज व कुरूंदवाड हा पटवर्धनांचा प्रदेश होता.[३] कोल्हापूर राज्याचा पृष्ठभाग उंच सखल असून त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची साधारण २००० फूट होती. कृष्णा, वारणा, हिरण्याकेशी, पंचगंगा, दूधगंगा, वेदगंगा या मुख्य सहा नद्या या राज्यात होत्या. पश्चिम सीमेवर दक्षिण–उत्तर सहयाद्रीची रांग होती. त्यामुळे अनेक टेकड्या व घनदाट अरण्यांनी व्यापलेला डोंगराळ प्रदेश हे या राज्याचे वैशिष्ट्य होते. राज्याच्या हद्दीतील डोंगर टेकड्यांची समुद्रसपाटी पासून सरासरी उंची २५०० फुट होती.[४] या राज्याच्या सह्याद्री पर्वत पठारावर पन्हाळा, विशाळगड, भुदरगड, रांगणा, सामानगड, गगनगड, पावरगड, मुडागड, शिवगड, महिपालगड, कलानिधीगड, पारगड, गंधर्वगड, हे दुर्ग होते.

**कोल्हापूर संस्थानातील शिक्षणव्यवस्था :**

कोल्हापूर संस्थानात पारंपारिक पद्धतीने शिक्षण दिले जात होते. बापाचा व्यवसाय शिकून घेवून पुढे तोच व्यवसाय चालविणे हाच शिक्षणाचा प्रकार होता. वडिलांची हत्यारे त्याला आयती मिळत असत. वडिलोपार्जित धंद्याचे ज्ञान त्याला घरबसल्या मिळत असे. जाता येता वडिलांचे काम त्याच्या नजरेखाली जाई. ते काम करण्यासाठी लागणारे साहित्य त्याला घरीच उपलब्ध होत असे. त्यामुळे आधुनिक शिक्षणचा गंधही समाजाला नव्हता. शिक्षणाची ज्ञानगंगा बहुजन समाजापर्यंत नेण्याचा प्रयत्न काही खाजगी शिक्षणप्रेमी मंडळींनी व ब्रिटिश सरकारने केला होता. पण तत्कालीन राजकारण व बहूजन समाजात असणारी शिक्षणविषयक अनास्था हे शिक्षण प्रसाराच्या व प्रचाराच्या मार्गातील अडसर होते. सन १८५४ पर्यत कोल्हापूर संस्थानात शिक्षण क्षेत्रात म्हणावी तशी प्रगती झाली नव्हती.

सन १८४८ मध्ये कोल्हापूर संस्थानात कोल्हापूर शहरी तसेच आळते, पन्हाळा व शिरोळ येथे सरकारी शाळा सुरू झाल्या. सन १८५१ मध्ये कोल्हापूर शहरात पहिली इंग्रजी शाळा सुरू झाली होती. या शाळेमध्ये एकोणीस विद्यार्थ्यानी प्रवेश घेतला होता.[५] याच सुमारास कागल, बावडा, गडहिंग्लज, भुदरगड, व मलकापूर या ठिकाणी शाळा सुरू झाल्या होत्या. सन १८५३ मध्ये कोल्हापूरात पहिली मुलींची शाळा सुरू होती. परंतु काही दिवसांनी मुलींची संख्या कमी होत गेली.

सन १८६६ मध्ये जेव्हा सर ग्रॅट हे शाळा पाहण्यासाठी आले तेव्हा शाळेचे नाव फक्त शिल्लक असलेले दिसून आले होते.[६] सन १८५३ नंतर कोल्हापूर संस्थानात शिक्षण क्षेत्रात प्रगती होत गेली. सन १८५४ मध्ये शाळांची संख्या नऊ होती. त्याच्या पुढील वर्षी शाळांची संख्या पंधरा झाली होती. त्या शाळांमध्ये ७०७ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १८५५ मध्ये बालक्रीडा मंदिर, व उर्दूशाळा सुरू करण्यात आली. याच वर्षी भुदरगड येथे मुलींची शाळा सुरू करण्यात आली. सन १८५९ मध्ये कोल्हापूर संस्थानातील शाळांची संख्या सतराच्यावर गेली होती. या शाळांमध्ये ११७३ विद्यार्थी शिक्षण घेत होते अशी नोंद आढळते.[७] सन १८६३ मध्ये अल्पवयीन सरदारांच्या शिक्षणासाठी कोल्हापूर येथे एक शाळा सुरू करण्यात आली होती. त्यात चोवीस विद्यार्थी होते. सन १८६६ पर्यंत या शाळेत फक्त नऊ सरदारपुत्र शिकत होते.[८]

छत्रपती शिवाजी तिसरे उर्फ बाबासाहेब महाराजांनी सन १८६३ मध्ये राज्यकारभार हाती घेतला तेव्हा सरकारी शाळांची संख्या आठरा झाली. बाबासाहेब महाराजांनी शिक्षण प्रसारावर भर दिली. तसेच समाजातही शिक्षणाविषयी आस्था वाढत गेली. कोल्हापूर संस्थेसाठी श्री. बाळ परशुराम पंडित यांची पहिले डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर म्हणून नेमणूक झाली. चांगले शिक्षक तयार करण्यासाठी एक ट्रेनिंग शाळा सुरू करण्यात आली. ट्रेनिंग शाळेमध्ये छपन्न विद्यार्थी शिक्षण घेत होते. तसेच कोल्हापूर राज्यात इंग्रजी–मराठी व मराठी शाळा अशा एकूण बत्तीस शाळा होत्या.[९] सन १८६७ राजाराम हायस्कूल स्थापना करण्यात आली. या हायस्कूलची इमारत भव्य

असावी पण राजवाड्यापासून दूर नसावी म्हणून ही इमारत जुन्या राजवाड्याजवळील घरे विकत घेवून ती पाडून तेथे राजस्थानी वास्तुपध्दतीवर आधारीत भव्य इमारत सन १८७१ मध्ये पूर्ण करण्यात आली. या इमारतीचा पहिला दगड राजाराम महाराजांनी बसविला होता. राजाराम महाराजांच्या अकाली निधनानंतर राजाराम महाराजांच्या स्मरणार्थ या हायस्कूलला 'राजाराम हायस्कूल' असे नाव देण्यात आले.[१०] या हायस्कूलचे पहिले मुख्याध्यापक महादेव मोरेश्वर कुंटे हे होते. सन १८७० मध्ये या शाळेत २५३ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १८७० मध्ये या शाळेत शिक्षण प्रसार करण्यामध्ये फार मोठा वाटा होता.

राजाराम हायस्कूलमध्ये न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे हे सन १८५१ मध्ये, नामदार गोपाळ कृष्ण गोखले सन १८७६ मध्ये शिक्षण घेत होते. सन १८८० मध्ये राजाराम कॉलेज सुरू होऊन तेथे कॉलेज विभाग, हायस्कूल व राजकुमार वर्ग सुरू होते. राजाराम कॉलेजचे पहिले प्राचार्य सी.एच.कॅडी हे होते.[११]

सन १८७२ पासून शिक्षणाचा प्रचार मोठया प्रमाणावर होत गेला. सन १८७२ मध्ये सरकारी शाळांची संख्या १०१ होती तर ४८७२ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १८८१ मध्ये शाळांची संख्या १५० असून ८४०६ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १८८१ मध्ये शिकणाऱ्या व लिहिता वाचता येणाऱ्या पुरूषांचे प्रमाण ७.६ टक्के व स्त्रियांचे प्रमाण ०.१५टक्के होते. मार्च १८८३ मध्ये कोल्हापूर येथे संस्कृत शाळा सुरू झाली होती. सन १८८३—८४ मध्ये १९० शाळा होत्या. त्यात राजाराम कॉलेज व हायस्कूल, एक ट्रेनिंग शाळा, एक स्त्रियांचा ट्रेनिंग वर्ग, सहा इंग्रजी—मराठी शाळा १५४ मराठी शाळा, एकोणीस रात्रीच्या शाळा व आठ मुलींच्या शाळा होत्या. सन १८८४—८५ मध्ये शाळांची संख्या २०२ होती तर विद्यार्थी संख्या १२,४०४ होती. सन १८८५—८६ मध्ये शाळांची संख्या २०८ असून १२,८४३ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १८८६—८७ मध्ये शाळांची संख्या २१२ असून १२,८९७ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १८९३—९४ मध्ये शाळांची संख्या २२४ असून १४,८१९ विद्यार्थी त्यामध्ये शिक्षण घेत होते.[१२]

**ट्रेनिंग शाळा:**

विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी सन १८६७ मध्ये ट्रेनिंग शाळेची स्थापना करण्यात आली. या शाळेत तीन वर्षे अभ्यासक्रम चालत होता. सन १८८३—८४ पूर्वी या शाळेमधून सरासरी दहा विद्यार्थी शिक्षक होवून बाहेर पडत असत. तसेच स्त्रीशिक्षक तयार करण्याकरिता सन १८८२ मध्ये स्त्रियांचा ट्रेनिंग वर्ग सुरू करण्यात आला. सन १८८६—८७ मध्ये मिस.लिटल या ट्रेनिंग वर्गाच्या सुपरिटेंडेंट होत्या. सन १८८५ पर्यत एकूण १६४ प्रशिक्षित शिक्षक बाहेर पडले होते.[१३]

**मुलींची शाळा :**

कोल्हापूर राज्यात स्त्री शिक्षणाकडे सुरूवातीला फारसे लक्ष दिले गेले नसल्याचे दिसून येते. कर्नल अॅडरसन हे पोलिटिकल एजंट म्हणून आल्यावर त्यांनी कोल्हापूर शहरात मुलींची शाळा सुरू केली. काही ठिकाणी मुलांच्या शाळेत मुलींही शिक्षण घेत असत. कोल्हापूर शहरातील मुलींच्या शाळेत कशिद्याचे काम, अंगरखे, पैरणी, चौळया शिवण्याचे शिक्षण मुलींना देण्यासाठी एका शिक्षकाची नेमणूक करण्यात आली होती. सन १८८३ मध्ये कोल्हापूर राज्यात नऊ मुलींच्या शाळा असून ५०० मुली शिक्षण घेत होत्या. सन १८८६—८७ मध्ये होतकरू व तरूण मुलींना वैद्यकीय परिचारिका शिक्षण देण्यासाठी वैद्यकीय विद्यालय सुरू केले होते. ते अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटलच्या आवारात होते. या वैद्यकीय विद्यालयाचे सुपरिटेंडेंट पद डॉ. आनंदीबाई जोशी यांच्याकडे देण्यात येणार होते पण त्यांचे फेब्रुवारी १८८७ मध्ये निधन झाल्याने ही योजना प्रत्यक्षात साकार झाली नाही. सुईणकाम वर्गही अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटलमध्ये सन १८८९—९० मध्ये सुरू करण्यात आला होता. सन १८९३—९४ मध्ये कोल्हापूर राज्यात २६ मुलींच्या शाळा होत्या. त्यामध्ये १,४१९ मुली शिक्षण घेत होत्या.[१४]

**रात्रशाळा:**

कोल्हापूर राज्यात रात्रशाळाही सुरू करण्यात आल्या होत्या. मजूर, करागीर, कुणबी, माळी, गवंडी, यांना दिवसा काम करून रात्री शिक्षण घेता यावे म्हणून कर्नल अंडरसन यांनी रात्रशाळा सुरू केल्या. सन १८७१ मध्ये कोल्हापूर शहरात पहिली रात्रशाळा सुरू करण्यात आली. सन १८८३ मध्ये रात्रशाळांची संख्या एकोणीस झाली होती. सन १८८३—८४ मध्ये कोल्हापूर येथील मध्यवर्ती तुरूंगामध्ये कैद्यांना शिक्षण देण्यासाठी रात्रशाळा सुरू केली होती. या शाळेची वेळ सांय ६ वे ८ अशी होती. सन १८९३—९४ मध्ये रात्रशाळांची संख्या राज्यात चार असून त्यामध्ये ११५ विद्यार्थी शिकत होते.[१५] राजाराम कॉलेजमध्ये चित्रकला वर्ग, शेतकी वर्ग सुरू करण्यात आले होते. शेतकी वर्ग श्री. डी. बी. मराठे यांच्या देखरेखीखाली होता. राजाराम कॉलेजमध्ये शारिरीक शिक्षणाकडेही लक्ष दिले जाई. येथील व्यायामशाळेचा दररोज वापर केला जात असे. राजाराम कॉलेजमध्ये उत्तमपणे क्रिकेट हा खेळ खेळला जात होता. जयसिंगपूर टेक्निकल शाळेत पितळी ओतकाम, सुतारकाम, चित्रकला, भूमिती, शिल्पकला व स्थापत्यशास्त्र हे विषय शिकवले जात असत.

कोल्हापूर राज्यात मुस्लीम धर्मियांच्या मुला—मुलींना शिक्षण देण्यासाठी तीन शाळा होत्या. मागासवर्गीय मुलांना शिक्षण देण्यासाठी कोल्हापूर राज्यात सन १८८९—९० मध्ये चार शाळा होत्या. त्या शाळांमध्ये १७२ विद्यार्थी शिकत होते. तर सन १८९१—९२ मध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शाळेत १५६ विद्यार्थी शिकत होते. 'कोल्हापूर येथे चांभार जातीच्या मुलांसाठी स्वतंत्र एक शाळा होती त्यात ६० विद्यार्थी शिकत होते.' सन १८९२—९३ मध्ये कोल्हापूर राज्यात १४ शाळा बंद करण्यात आल्या होत्या. तर सन १८९३—९४ मध्ये एक रात्रशाळा, तीन खेडयांमधील शाळा, एक सुईणकाम वर्ग एकूण पाच वर्ग बंद करण्यात आले होते.

विद्यार्थी बहुदा निर्व्यसनी असत. संयम व शिस्त यांनी बांधले गेलेले होते. गुरूजनांबद्दल, वडिलधा–यांबद्दल त्यांना आदर होता. 'छडीलागे छम छम विद्या येईल घम घम' ही म्हण त्याकाळी सर्वाच्या तोंडी असायची. अभ्यासात कच्च्या व उनाड मुलांना गुरूजी छडीने मारत. तरी मुले हू की चू करीत नसत. याशिवाय अंगठे धरणे, कान धरून ऊठ बशा काढणे, मानेवर खडा ठेवून वाचायला लावणे अशा शिक्षा विद्यार्थ्यांना देत.[१६]

**निष्कर्ष:**

भारतातील प्रथापरंपरेनुसार कोल्हापूर संस्थानातही पारंपारिक शिक्षणव्यवस्था होती. मात्र हळूहळू आधुनिक शिक्षणव्यवस्थेला सुरवात झाली. मराठीप्रमाणेच इंग्रजी शाळा सुरु करण्यात आल्या. सुरवातीला मुलींच्या शाळांना प्रतिसाद नव्हता मात्र नंतरच्या काळात तो मिळत गेला. छत्रपती शिवाजी तिसरे उर्फ बाबासाहेब महाराजांनी शिक्षण प्रसारावर भर दिला. राजाराम हायस्कूल व राजाराम कॉलेज यांचा शिक्षण प्रसार करण्यामध्ये फार मोठा वाटा होता. ट्रेनिंग शाळा, रात्रशाळा यांचाही शिक्षण प्रसार करण्यामध्ये मोलाचा वाटा आहे. मुस्लीम धर्मियांच्या मुला–मुलींना शिक्षण देण्यासाठी असलेल्या शाळा व मागासवर्गीय मुलांना शिक्षण देण्यासाठी असलेल्या शाळा यावरुन राज्यकर्त्यांचा सर्वसमावेशक दृष्टिकोन स्पष्ट होतो.

**संदर्भ:**

१. महल्ले–पाठक, मराठा सत्तेचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर; १९९७ पृ. ६२
२. करवीर राज्याचा इतिहास, श्री महाराणी ताराबाई टिचर्स कॉलेज पुस्तकमाला नं.१, १९७१, पृ. ३
३. कित्ता पृ.४
४. शिंदे खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास निर्मिती विचारमंच, कोल्हापूर; २००९ पृ .१६
५. शिंदे खंडेराव, उपरोक्त पृ. १६
६. मोडक बा. प्र., कोल्हापूर राज्याचा इतिहास, अनंत प्रकाशन, कोल्हापूर; १८९३ पृ. ७०
७. कित्ता पृ. १२०
८. कित्ता पृ. १५८
९. शिंदे खंडेराव, उपरोक्त पृ. १०५
१०. राजाराम हायस्कूल शत सांवत्सारिक महोत्सव विशेषांक; १९५३, पृ. ३६
११. शिंदे खंडेराव, उपरोक्त पृ. १०६
१२. शिंदे खंडेराव, उपरोक्त पृ. १०७
१३. मोडक बा. प्र., उपरोक्त पृ. २१४
१४. शिंदे खंडेराव, उपरोक्त पृ. १०८
१५. शिंदे खंडेराव, उपरोक्त पृ. १०९
१६. कोल्हापूर जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र शासन प्रकाशन; १९६०, पृ. ४२६